पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१०/०५/२०१८** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पहिली सभा (विशेष सभा) गुरुवार दिनांक **१०/०५/२०१८** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्री.मिलीन्द शंभरकर, (भा.प्र.से.)** आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
२. मा.बारणे माया संतोष
३. मा.भोईर सुरेश शिवाजी
४. मा.घोलप कमल अनिल

या शिवाय मा.कापडणीस – सहा. आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे** – सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.शहर सुधारणा समितीचे **सभापती** पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.शहर सुधारणा समितीच्या **सभापती** पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

**मा.नगरसचिव -** मा.शहर सुधारणा समितीचे **सभापती** पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.शहर सुधारणा समिती **सभापती** पदाकरीता मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे छाननी करणेकामी सुपुर्त करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **मा.पिठासीन प्राधिकारी तथा आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे** | - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **सभापती**, शहर सुधारणा समिती पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. |

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.चौगुले सीमा दत्तात्रय | मा.घोलप कमल अनिल | मा.भोईर सुरेश शिवाजी |

मा.सभापती, शहर सुधारणा समिती या पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून सदर नामनिर्देशनपत्र परिपूर्ण आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशनपत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशनपत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि समितीच्या दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली आहे. सबब सदरचे नामनिर्देशनपत्र वैध असून स्विकृत करण्यात येत आहे.

त्यामध्ये शहर सुधारणा समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.चौगुले सीमा दत्तात्रय** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

- **नामनिर्देशनपत्र माघारी घेणे** -

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा ( दुपारी १२.०७ ते १२.२२ वा.) कालावधी देणेत येत आहे.

**- उमेदवार निवडून आल्याची घोषणा –**

नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याचा कालावधी संपला आहे. या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब मा.सभापती, शहर सुधारणा समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा. चौगुले सीमा दत्तात्रय** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.चौगुले सीमा दत्तात्रय** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी मिलीन्द शंभरकर, पिठासीन प्राधिकारी, शहर सुधारणा समिती (विशेष सभा) जाहीर करतो.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १
दिनांक - १०/०५/२०१८ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.शहर सुधारणा समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा. चौगुले सीमा दत्तात्रय** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा. चौगुले सीमा दत्तात्रय** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

**---------**

**सही/-**
**(मिलीन्द शंभरकर, भा.प्र.से.)**
पिठासीन प्राधिकारी तथा
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे
शहर सुधारणा समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

( नवनिर्वाचित सभापती **मा. चौगुले सीमा दत्तात्रय** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

मा.नगरसचिव - विषय क्र.२ - मा.शहर सुधारणा समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

(मा.शहर सुधारणा समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.)

----------

ठराव क्रमांक - ०२
दिनांक - १०/०५/२०१८
सुचक : मा.सुरेश भोईर

विषय क्रमांक - ०२
विभाग – नगरसचिव
अनुमोदक : मा.कमल घोलप

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीच्या **उपसभापती** पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.शहर सुधारणा समितीच्या **उपसभापतीची** नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०३
दिनांक - १०/०५/२०१८
सुचक : मा.सुरेश भोईर

विषय क्रमांक - ०३
विभाग – नगरसचिव
अनुमोदक : मा.कमल घोलप

मा.शहर सुधारणा समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या मंगळवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी/सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(चौगुले सीमा दत्तात्रय)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२६४/२०१८
दिनांक : १०/०५/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.